P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police,
Premlok Park Chinchwad, Maharashtra - 41



**प्रेसनोट दिनांक–२७/११/२०२६**

**दि. २६/११/२०२६ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यंत दाखल गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ७९६/२०२६, बी.एन.एस २०२३ चे कलम १८९(२), १९१(२), १९०, ३२४,(४), ३५२, ३५१(२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि२२/११/२०२६ रोजी सकाळी ११.५३ ते १२/३० च्या दरम्यान सर्व्हे नं ३३/१/१ पिंपळे गुरव पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि. २६/११/२०२६ रोजी ०१.४८ वा |
| फिर्यादी | :- | रमेश शंकर जाधव वय-७१ वर्षे व्यवसाय-नाही रा.- सर्व्हे नं ३३, कोहीनुर पॅलेस, शिवरामनगर, महाराजा हॉटेलसमोर, पिंपळे गुरव पुणे |
| आरोपी | :- | १) किसन लक्ष्मण चव्हाण रा. फ्लॅट नं ७०६, बॅसीलीओ सोसायटी, पिंपळे गुरव पुणे<br>२) सुनिल भास्कर काळे रा. सर्व्हे नं ३८/१/५६ श्रीनगर लेननं १, १० ईलाईट समोर मु पो पिंपळे गुरव पुणे इतर ७ ते ८ इसम व ४ ते ५ महीला |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्र १ व २ यांनी इतर ७ ते ८ इसम व ४ ते ५ महीला यांचा जमाव जमवुन फिर्यादी यांचे मिळकत क्रमांक सर्व्हे ३३/१/१ मधीलक्षेत्र ०५ आर मिळकतीवर येवुन तेथे सदरची मिळकत ३३/१/४ अशी असल्याचा दावा करुन फिर्यादी यांचे पत्र्याच्या शेडचे व पत्र्याच्या गेटचे तोडुन नुकसान करुन फिर्यादी व त्यांचे घरचे महीलांना शिवीगाळ व दमदाटी केली आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पाटील ९३३७२७३४५० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५३६/२०२६ भारतीय न्यायसंहीता कलम ११८(१),३५१(२),३(५)प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २५/११/२०२६ रोजी २३.३० वा.चे सुमा नवमी हॉटेल तळेगाव दाभाडे येथील पानटपरीवर ता. मावळ जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. २६/११/२०२६ रोजी ०७.५६ वा |
| फिर्यादी | :- | राहुल राकेश मोरे वय ३० वर्षे व्यवसाय नोकरी रा.तेली आळी चौक साईनाथ कॉलनी तळेगाव दाभाडे ता.मावळ जि पुणे |
| आरोपी | :- | १)दिलिप बनसोडे अंदाजे ५७ वर्षे,<br>२)अजय बनसोडे वय अंदाजे ३२ वर्षे,<br>३) गणेश बनसोडे वय अंदाजे २९ वर्षे सर्व रा.संभाजीनगर तळेगाव दाभाडे |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना आरोपी क्र १ ते ३ यांनी त्यांचे वडील दिलिप बनसोडे यांना ट्रिपला गेलो असता मारले नसतानाही फिर्यादी यांनी दिलिप बनसोडे यांना मारले असे म्हणून फिर्यादीस फायबरचे दांडक्याने व लाथा-बुक्याने मारहाण करून साधी दुखापत केली व जीवे मारून टाकणेची धमकी दिली आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/८११ चव्हाण ७०२०१३१८०४ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी १०६४/२६ भारतीय न्याय संहिता कलम- ११८(१),३५१(१),३५२, ३(५) भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५,२७, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट कलम- ३,७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/११/२०२६ रोजी रात्रौ ०८/४५ वाजताचे सुमाराम खुशबु हॉटेल पिंपरी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २६/११/२०२६ रोजी १९.१५ वा |
| फिर्यादी | :- | अजय ऊर्फ जीमी उदय सिंग वय-३४ वर्ष, धंदा-व्यवसाय, रा.डिलक्स चौकाचे बाजुला गणपती मंदिरासमोर इंदिरा नगर पिंपरी पुणे |
| आरोपी | :- | १) मोनु बहोत वय अंदाजे २७ वर्ष, रा.कैलास नगर पिंपरी पुणे,<br>२) अक्षय हजारे वय अंदाजे-२५ वर्ष, रा.पिंपरी पुणे व इतर |
| तपशिल | :- | नमूद तारिख, वेळी वा ठिकाणी यातील फिर्यादी हे जेवण करण्यासाठी खुशबु हॉटेल साई चौक पिंपरी येथे गेले |

असताना, तेथे इसम नामे मोनु बहोत वय अंदाजे २७ वर्ष, व अक्षय हजारे वय अंदाजे-२५ वर्ष, हे दोघे हातात कोयते घेवुन आले व त्यांचे सोबत इतर इसम होते व त्यांनी फिर्यादी यांना जुन्या भांडणाचे कारणावरून शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन त्यातील अक्षय हजारे याने त्याचे हातातील लोखंडी कोयता फिर्यादी यांचे डावे गालावर मारून गंभीर जखमी केले असता, हॉटेलमधील मॅनेजर, वेटर व कस्टमर जमा झाले, तेव्हा मोनु बहोत व अक्षय हजारे म्हणाले " आम्ही इथले भाई आहोत, आमचे भांडणामध्ये कोणी येवु नये, आमचे मध्ये आला तर तुम्हालाही जीवंत सोडणार नाही" असे म्हणुन ते त्यांचेकडील हातातील कोयते फिरवित हॉटेलमध्ये दहशत निर्माण करु निघुन गेले.

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि इंगळे ९८६०२५५८१७

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी १०६९/२०२६भा.न्या.सं.कलम११७(२)११५(२),३५२प्रमाणे भादवी कलम ३२५, ३२३

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२६/११/२०२६ रोजी सकाळी०८/०० वाजता ३३ माईल्ड स्टोन सोसायटि भुमकर चौक वाकड,पुणे येथे सोसायटीचे आवारात

गुन्हा दाखल :- दिनांक २६/११/२०२६ रोजी २२.४३ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- विकास खुशीराम कश्यप, वय२६वर्षे. धंदा-सिक्युरीटी, रा-गोखलेनगर, वडारवस्ती, चतुरसिंगीमंदिर, शिवाजीनगर, पुणे

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी घरकामासाठी गेली असता. त्यांचा मित्र नामे विकास खुशीराम कश्यप, वय २६वर्षे. फिर्यादी मागोमाग येऊन फिर्यादी सोबत चल असे बोलुन मी नकार दिल्याने. विकास याने फिर्यादीस हाताने, लाथाबुक्कयांने मारहाण करुन शिवीगाळ, करुन फिर्यादी यांच्या नाकावर हाताचा जोरदार ठोसा मारुन फिर्यादी यांच्या नाकावर चार टाके पडले असुन नाकाचे हाड मोडुन गंभिर दुखापत केली

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि वांगणेकर ९६२३६९८८९९

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी १०६३/२०२६ भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५(अ) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/११/२०२६ रोजी रात्री २२/०० वा.चे.सुमारास ते दि.२६/११/२०२६ रोजी रात्रौ ०३/०० वा.चे.दरम्यानजिया इलेक्ट्रिकल दुकान हेमु कलानी माकेट, पिंपरी, पुणे

गुन्हा दाखल :- दि २६/११/२०२६ रोजी १७.३७ वा

फिर्यादी :- दिपक फुलचंद लोढा वय ३७ वर्ष धंदा - व्यवसाय रा. स्वीस कॉन्टी, एल बिल्डींग, प्लॅट नं ४०२ थेरगाव पुणे

आरोपी :- अज्ञात आरोपी

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी एकुण ९०,०००/- रु.कि.चे येणेप्रमाणे एक १.०० स्क्वेअर एम.एम. लाल-काळया रंगाचे१० बंडलट एक १.५ स्क्वेअर एम.एम. लाल-काळया रंगाचे ३१ बंडल व २.५ स्क्वेअर एम.एम. लाल-काळया रंगाचे ०६ बंडल असे घरगुती लाईटसाठी लागणारे वायरींगचे बंडल फिर्यादी यांचे जिया इलेक्ट्रिकल दुकान हेमु कलानी माकेट, पिंपरी, पुणे या दुकानाचे लॉक लावुन बंद असताना कोणी तरी अनोळखी इसमाने दुकानाचे छताचा लोखंडी पत्रा उचकटुन त्यावाटे आत प्रवेश करुन फिर्यादी यांचे संमती शिवाय त्याचे आर्थिक फायदया करीता घरफोडी चोरी करुन नेला आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- श्रेपोउपनि पठाण ७०२८३६६७६२

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ८५४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम- ३१८(४),३१९(२) सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम ६६(सी), ६६(डी), प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२५/११/२०२६ रोजी सकाळी ११/३५ वा.सुमारास ते १७.०० वा.चे दरम्यान
भैरट पाटील इम्पायर स्टील्ट फोअर, ऑफिस न. ०१, वेनु नगर,वाकड पुणे येथे.

गुन्हा दाखल :- दि२६/११/२०२६ रोजी ००/५२ वा

फिर्यादी :- श्री. नबीराज स्वामीनादन वय ३६ वर्षे,धंदा – नोकरी, राहणार–प्लॅट न. ०२,मातोश्री बिल्डीग, कुणार हॉटेल जवळ, तापकीरनगर,काळेवाडी पुणे

आरोपी :- अनोळखी ईसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने अगध लॉजिस्टीक अॅन्ड सप्लाय चैन सर्विस प्रायवेट लिमीटेड या कंपणीचे

मालक/डायरेक्टर नामे श्री. आंनद मोहगावकर याचा मोबाईल क्र. ९५९४२२२२६६ याचा बनावटीकरण करून त्यांचा मोबाईल क्रमांकावरून फिर्यादी यांना वॉटसअप मेसेज करून ३०,०००००/- लाख रूपये पाठविण्यास सांगुन फिर्यादी यांना तो मालकाचा मोबाईल क्रमांक आहे असे भासवुन बॅक नाव -आयसीआयसीआय, खाते प्रकार-करन्ट खाते, खाते नाव – एस.आर.पी.प्रोपेरटिस, खाते क्रमाकावरुन. आयएफएससी कोड - ICIC0000700, शाखा –SRIKAKULAM या बॅकेत ३०,०००००/- लाख रूपये भरण्यास सागुन फिर्यादी याची आर्थिक फसवणुक केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि साळुंखे, ९१३०७४४४११

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- बावधन ७५२/२०२६भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम ३१६(२), ३१८(४) सह आयटी ॲक्ट ६६(सी) व ६६(डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१७/११/२०२६ रोजी पासुन दि.२१/११/२०२६ पर्यंत सी-१३ अथश्री सोसायटी, बावधन ता.मुळशी जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.२६/११/२०२६ रोजी १८/४७ वा

फिर्यादी :- बाबु राजेंद्र राघवेंद्रराव हेजीब वय ८२ वर्षे काम - सेवानिवृत्त, रा. सी-१३ अथश्री सोसायटी, बावधन ता.मुळशी जि.पुणे

आरोपी :- ०३ अज्ञात मो.क्र धारक

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे मोबाईलनंबर वर अज्ञात ०३ मोबाईल यावरुन अज्ञात इसमांनी फिर्यादी यांना व्हॉट्सॲपवर कॉल करुन ~Xtradeया फॉरेन एक्सचेंज ट्रेडमध्ये पैसे गुंतवण्याच्या बहाण्याने फिर्यादीचे एचडीएफसी बँक औंध शाखेमधील सेव्हिंग खाते क्र. यावरुन वेळोवेळी एकुण २४,६४,३१५.११/-रु. एवढी रक्कम घेवुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउनि बत्तिशे ९०२१८००६९३

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ५३७/२०२६ भारतीय न्याय संहीता कलम २८१, १२५(अ) सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४, १३४ (अ) (ब) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २६/११/२०२६ रोजी १२.४५ वाचे सुमारास बेदरकर क्लिनिकसमोर मारुती मंदीर चौक तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि. २६/११/२०२६ रोजी २०.४२ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- चारचाकी गाडी नंबर MH 14 NS 6260 वरील चालक (नाव पत्ता माहीत नाही)

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे घरी पायी चालत जात असताना बेदरकर क्लिनिकसमोर मारुती मंदीर चौक जवळ आल्या असता तेथे रोड क्रॉस करत असताना बेटी बचाव पुतळ्याकडुन आलेल्या चारचाकी गाडीनंबर MH 14 NS 6260 वरील चालकाने रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करीत त्याचे ताब्यातील वाहन बेदरकारपणे व हयगयीने चालवुन त्यांना जखमी केले म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा १८१७ साबळे-९८५०९८३०१३

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एम.आय.डी.सी भोसरी ९४४/२०२६ भारतीय न्याय संहिता-२०२३ चे कलम- २८१,१२५(अ),३२४(४) सह मोटार वाहन कायदा कलम-१८४,११९/१७७, प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि२५/११/२०२६ रोजी दुपारी १५/०० वा.चे सुमारास पुणे नाशिक हायवेवरील विक्रांत नर्सरी समोरील रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि.२६/११/२०२६ रोजी १८/३१ वाजता |
| फिर्यादी | :- | किशोर भाऊसाहेब पोटे वय-३३ वर्षे धंदा-नोकरी रा.बनकरवस्ती मोशी,पंचरत्न निवास,मोशी पुणे |
| आरोपी | :- | कार क्र.एम.एच.०४ एच.एम.२५२१ महिंद्रा कंपनीची टी.यु.व्हि.यावरील चालक नामे-भगवान नारायण वाजे वय-४५ वर्षे धंदा नोकरी रा.घर नं.१६०६ मु.पो.आळंदी देवाची जुना च-होली रोड ता.खेड जिल्हा पुणे. |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांची पत्नी व मुलगा हे राहते घरातुन आळंदी येथे त्यांची सुझुकी कंपनीची सीयाज गाडी क्र.एम.एच.१७ ए.झेड.४१३८ मधुन खरेदी करण्यासाठी जात असताना पुणे नाशिक हायवेवरील विक्रांत नर्सरी समोरील रोडवर वाहतुक कोंडी झाल्याने थांबले असता, त्यांच्या पाठीमागुन इसम नामे-भगवान नारायण वाजे वय-४५ वर्षे याने त्यांचे ताब्यातील कार क्र.एम.एच.०४ एच.एम.२५२१ महिंद्रा कंपनीची टी.यु.व्हि.ही भरधाव वेगाने हयगईने,बेदरकारपणे वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन वाहन चालवित घेवुन येवुन माझ्या गाडीला पाठीमागुन धडक दिल्याने माझ्या गाडीचे पाठीमागील बाजुचे बंपर व डिक्की चेंबुन नुकसान झाले आहे,तसेच अपघातामध्ये जोराची धडक बसल्याने फिर्यादी यांची पत्नी व मुलगा त्यांच्या शेजारील कोड्राईव्हर सीटवर बसलेले होते,त्यावेळी त्यांच्या पत्नीचे डोके कारच्या डॅसबोर्डवर आदळल्याने त्यांच्या नाकातुन रक्त येवु लागले फिर्यादी लगेच त्यांना घेवुन धनश्री हॉस्पिटल मोशी पुणे येथे आणुन ॲडमिट केले आहे.तेथील डॉक्टरांनी तीचे प्राथमिक उपचार करुन डोक्याचे सी.टी.स्कॅन केले आहे.त्यामध्ये मेंदुला सुज आली असुन नाकास अंतर्गत मार लागुन किरकोळ दुखापतीस कारणीभुत झाला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा १५६८ रोकडे ८८८८८५१७४४ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड ४९४/२०२६ भारतीय न्याय संहीता २०२३चेकलम ३०३(२) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २५/११/२६ रोजी संध्याकाळी ०६/०० वाजता ते दिनांक २६/११/२०२६ रोजी सकाळी ०८/०० वाजता गट नं-८६ वाणीमळा देहूगाव पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २६/११/२०२६ रोजी १५/४६ वा |
| फिर्यादी | :- | ईश्वर राजेंद्र चौधरी वय-३४ वर्षे धंदा-नोकरी रा. बोराडेवाडी, मोशी ता.हवेली, जि. पूणे |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणावरुन २०० ईलेक्ट्रीक के. व्ही. एट्रान्सफार्मर (रोहीत्र) खोलुन त्यामधील ४५,०००/- रु किंची ७० किलो तांब्याची तार कोणीतरी अज्ञात चोरट्याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी चोरी करून घेवुन गेले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जाधव . ९५२७३७४६१६ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी १०५८/२६ भारतीय न्याय संहिता कलम ३(५) सह कॉपी राईट ॲक्ट १९५७ चे कलम ५१,६३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक २५/११/२०२६ रोजी सायंकाळी १८:१० वाजता प्लॉट क्रमांक २३०,बाबा मार्केट शेजारी रिव्हर रोड, पिंपरी कॉलनी पुणे येथे असलेले रेश्मा ईलेक्ट्रिकल्स दुकानात |
| गुन्हा दाखल | :- | दि. २६/११/२०२६ रोजी ०४.१० वा |
| फिर्यादी | :- | चेतन मोतीराम गनात्रा वय ५० वर्ष व्यवसाय–विनय इलेक्ट्रिकल सोल्युशन तपासणी अधिकारी रा- प्लॉट क्रमांक ९५, सेक्टर क्रमांक २७ राम मंदीरा समोर, निगडी प्राधिकरण, निगडी पुणे |
| आरोपी | :- | विनोद लक्ष्मणदास जेठवाणी वय ५० वर्ष धंदा- इलेक्ट्रिक दुकान रा- पिंपरी पुणे. |
| तपशिल | :- | नमुद केले ता.वेळ व ठिकाणी आरोपी नामे विनोद लक्ष्मणदास जेठवाणी वय ५० वर्ष याने विनय इलेक्ट्रिकल सोल्युशन कंपनीने उत्पादित केलेल्या मालाप्रमाणे कंपनीचे नावासारखे साधर्म्य असणारे नावाने नक्कल व बनावट केलेले वरिल वर्णनाचा माल विक्री करिता स्वतःचे दुकानात बाळगलेला असताना मिळून आला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउनि गावडे युनिट १ |